## ज्योतिषविषयक

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



DIRECT ADMISSION

MBBS | MD | MS | BDS | MDS

BAMS | BUMS | BHMS

PANCHAKARMA

DERMATOLOGY | NURSING

PHARMACY

PHYSIOTHERAPY

PARAMEDICAL | VETERINARY

OPHTHALMOLOGY | FMGE

Indo Abroad Education

9326134770



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १६२ वा | बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# जिल्हा परिषद निवडणुकानंतर सातारा गॅझेट लागू होणार

## मंत्रालयातील बैठकीत मराठा आरक्षणवर चर्चा

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यात मराठा आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा शासन निर्णय घेण्यात आला. त्यामुळे, हैदराबाद गॅझेटियरच्या निर्णयानुसार मराठावाड्यातील अनेक मराठा बांधवांना ओबीसी प्रवगार्तून आरक्षणाचा लाभ मिळण्यासही सुरुवात झाली आहे.

मात्र, मराठा आंदोलक उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणावेळी राज्य सरकारने हैदराबाद आणि सातारा गॅझेट लागू करण्यासंदर्भातील त्यांच्या मागण्या मान्य केल्या होत्या. त्यामुळे, हैदराबाद गॅझेटियर लागू झाले पण सातारा गॅझेटियर कधी लागू होणार? असा प्रश्न मराठा बांधवांना पडला आहे. सातारा गॅझेटियरचा लाभ साताऱ्यासह पश्चिम महाराष्ट्रातील मराठा बांधवांना होणार असल्याने या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आता, यासंदर्भात महत्त्वाची अपडेट समोर आली आहे.

मराठा आरक्षण उपसमितीची आज मंत्रालयात बैठक संपन्न झाली, उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वात या बैठकीत सातारा




गॅझेटियरवर प्रामुख्याने चर्चा झाली. तसेच, हैदराबाद गॅझेटियर अंमलबजावणी आणि मराठा आरक्षण विषयावर आढावा घेण्यात आला. त्यानुसार, राज्यातील जिल्हा परिषद निवडणुकांनंतर सातारा गॅझेटियर लागू करण्यात येणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीनंतर सातारा गॅजेट लागू करण्यासंदर्भात निर्णय होण्याची शक्यता असल्याची सूत्रांची माहिती आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमुळे सातारा गॅजेट लागू करण्यास अडचणी येत आहेत. अशातच, फक्त इंटरप्रिटेशनचा भाग असल्याने यासंदर्भात देखील लवकरच निर्णय होणार असून समज-गैरसमज दूर करत मराठा आरक्षणासंदर्भात सातारा गॅजेट लागू करण्यासंदर्भात हालचाली सुरू झाल्या आहेत. राज्यात गेल्या काही महिन्यांपासून निवडणुकाची रणधुमाळी पाहायला मिळत आहे. आधी नगरपालिका निवडणुका, पुन्हा महापालिका आणि आता जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्रातील जवळपास सर्वच जिल्ह्यात आचारसंहिता लागू असल्याने राज्य सरकारला काही महत्त्वाचे निर्णय किंवा नागरिकांना थेट लाभ होईल, असे निर्णय घेतात येत नाहीत.

### जरांगे पाटलांचे मुंबईत उपोषण

दरम्यान, उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मुंबईतील आझाद मैदानात मोठं आंदोलन करण्यात आलं होतं. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यात यावं, हैदराबाद आणि सातारा गॅझेट लागू करण्यासह विविध मागण्या जरांगे पाटील यांनी सरकारपुढे ठेवल्या होत्या. त्यावेळी, मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री उदय सामंत यांनी दिलेल्या आश्वासनानंतर त्यांनी आपलं उपोषण मागे घेतलं होतं.

# विमलताई खताळ यांना शिंगोली - कोरवली भागात प्रचंड प्रतिसाद

### कमळ चिन्ह घराघरात पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांना आवाहन

## युवा नेते अक्षय दादा खताळ यांचा कार्यकर्त्यांच्या वैयक्तिक भेटीवर फोकस

**कुरुल (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेच्या होऊ घातलेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवार विमलताई तानाजीराजे खताळ यांच्या प्रचाराच्या निमित्ताने युवा नेते अक्षय दादा खताळ यांनी शिंगोली , तरटगाव, हराळवाडी , कोरवली या गावांचा गावभेट दौरा केला. या गावात मोठ्या उत्साहात व आनंदाने नागरिकांनी त्यांचे स्वागत केले असून त्यांना प्रचंड मोठा प्रतिसाद मिळाला आहे तर भारतीय जनता पार्टीचे व तालुक्यातील सर्व उमेदवाराचे कमळ चिन्ह घराघरात पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी झपाटून काम करावे असे आवाहन युवा नेते अक्षय दादा खताळ यांनी केले आहे.



या गावभेट दौऱ्यात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्र सरकारच्या माध्यमातून नागरिकांसाठी सुरू केलेल्या लोकहिताच्या योजनांची माहिती दिली.तर राज्याचे विकासप्रिय मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी महिलांच्या,शेतकऱ्यांच्या , विद्यार्थ्यांच्या जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या सुरू केलेल्या अनेक योजनांची माहिती दिली.तर या गटात माजी जिल्हा परिषद सदस्य स्व.तानाजीराजे खताळ यांनी अनेक विकासाच्या योजना आपल्या गावासाठी आणल्या आहेत.आणि या पुढील गावचा विकास हा पालकमंत्री ना.जयकुमार गोरे व आमचे नेते माजी आमदार राजन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही करणार आहोत.असे अभिवचन ही यावेळी विमलताई खताळ यांनी नागरिकांना दिले.

### पूर परिस्थितीमध्ये केलेल्या मदतीची आठवण करून दिली

या गावांना काही दिवसांपूर्वी आलेल्या महापुराच्या फटका मोठ्या प्रमाणात बसला होता. अनेक लोक घरात अडकून पडले होते.अनेकजण शेतात अडकले होते.अनेकांचे संसार पाण्यात वाहून गेले. अनेकांची जनावरे पाण्यात वाहून गेली.घरातील धान्य, संसार उपयोगी वस्तू सर्वकाही पाण्यात गेले.अशा कठीण प्रसंगी मदत नव्हे आपले कर्तव्य आहे.ही भावना मनात ठेऊन खताळ परिवाराने नागरिकांसाठी मदतीचा हात दिला होता.याची आठवण या गावभेट दौऱ्यात अनेकांनी करून दिली.

# रणजितसिंह शिंदेंच्या सक्रिय प्रचाराने भाजपला मिळाली नवी ताकद

## मानेगावात पृथ्वीराज सावंत यांच्या प्रचारार्थ गावभेट संवादावर भर

**माढा (कटूसत्य वृत्त):-** मानेगाव जिल्हा परिषद गटातील निवडणूक प्रचार आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला असून, या प्रचारात भाजपकडून उमेदवार पृथ्वीराज सावंत यांच्या समर्थनार्थ नेते रणजितसिंह शिंदे आक्रमक भूमिकेत दिसून येत आहेत. गावोगावी भेटी, थेट संवाद आणि स्थानिक प्रश्नांवर स्पष्ट भूमिका मांडत रणजितसिंह शिंदे यांनी प्रचाराला वेगळीच धार दिली आहे. कार्यकर्ते आणि मतदारांशी थेट संवाद साधत त्यांनी भाजपची भूमिका प्रभावीपणे मांडल्याचे चित्र सध्या मानेगाव गटात पाहायला मिळत आहे.

रणजितसिंह शिंदे यांनी आपल्या प्रचार दौऱ्यादरम्यान विकास, पारदर्शक कारभार आणि जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर भर दिला. रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण आणि रोजगार या मुद्द्यांवर भाजपची



ठोस भूमिका मतदारांसमोर मांडत, 'जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारा उमेदवार आवश्यक आहे,' असे मत त्यांनी व्यक्त केले. पृथ्वीराज सावंत हे स्थानिक पातळीवर जनतेशी जोडलेले, काम करणारे आणि विश्वासार्ह उमेदवार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या प्रचारादरम्यान मानेगाव गटात भाजपच्या विरोधात उभे असलेले सुहास पाटील जामगावकर यांच्याबाबतही रणजितसिंह शिंदे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. 'एकेकाळी सहकारी असले तरी सध्या ते विरोधी भूमिकेत आहेत. त्यांचा भाजपशी किंवा आमच्याशी कोणताही संबंध नाही,' असे ठाम शब्दांत त्यांनी सांगितले. यामुळे मतदारांमध्ये कोणताही संभ्रम राहू नये, हा संदेश देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. रणजितसिंह शिंदे यांनी स्पष्ट केले की, 'भाजपचा एकमेव आणि अधिकृत उमेदवार पृथ्वीराज सावंत हेच आहेत. मानेगाव गटाच्या विकासासाठी त्यांनाच भरघोस मतांनी निवडून देणे आवश्यक आहे.' त्यांच्या या स्पष्ट भूमिकेमुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारल्याचे दिसून येत आहे.

गावभेटी, छोट्या सभा आणि थेट संवाद यामुळे प्रचारात रंगत आली असून, मतदारांमध्येही उत्सुकता वाढली आहे. रणजितसिंह शिंदे यांच्या सक्रिय सहभागामुळे भाजपचा प्रचार अधिक प्रभावी होत असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. येत्या निवडणुकीत मानेगाव गटात कोण बाजी मारणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले असून, प्रचाराच्या या निर्णायक टप्प्यात भाजपने आपली ताकद पणाला लावल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

# आदिवासी कोळी समाजाचा एक फेब्रुवारीला वधू-वर मेळावा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बटगेरी सामाजिक प्रतिष्ठान सोलापूर संचलित आदिवासी कोळी समाजाचा १४ वा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा रविवार, दि. १ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी ५ वाजेपर्यंत मुळे सभागृह, हरिभाई देवकरण प्रशाला प्रांगण, सोलापूर येथे आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष शंकर बटगेरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या मेळाव्यात समाजाच्या इयत्ता १० वी व १२ वी मध्ये विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार




आहे.या मेळाव्यात आदिवासी कोळी समाजासह समाजाच्या इतर सर्व पोटजातीच्या समाजबांधवांची प्रथम वधु-वर नोंदणी तसेच घटस्फोटीत / घटस्फोटीता, विधूर/विधवा यांची देखिल नोंदणी करण्यात येवून सेवा देण्यात येत आहे. तसेच नुकतेच झालेल्या नगर परिषद व महानगरपालिकेमध्ये नगरसेवक व नगरसेविका म्हणून निवडून आलेल्या समाजातील नगरसेवकांचा सत्कार करण्यात येणार आहे. मेळाव्यासाठी प्रमुख पाहुणे विष्णुपंत कोळी (मुंबई), माजी आमदार प्रकाश यलगुलवार, उज्ज्वला साळुंके इत्यादी प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत.

मेळाव्यासाठी महाराष्ट्रातील, तेलंगाणा, आंध्र प्रदेश व कर्नाटकातील कोळी समाज वधु-वर व पालक उपस्थित राहणार आहेत. कोळी समाजातील गरजू वधु-वर पालकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात येत आहे.

या पत्रकार परिषदेला संस्थेचे सचिव नागनाथ दोरणाळे, खजिनदार शिवलिंग कोळी, शिवपुत्र जमादार, विश्वनाथ बिदरकोटे, हनुमंत मोतीबने, मनीष कोळी आदी उपस्थित होते.

# पापय्या तालीम संघात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** २६ जानेवारी २०२६ रोजी पापय्या तालीम संघाच्यावतीने जुनी मिल कंपौड येथील ऐतिहासिक वारसा पापय्या तालीमच्या प्रांगणात ७७ वा प्रजासत्ताक दिन भव्य व उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे चंडक प्रशालेचे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते, सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्यवाह व संस्थेचे माजी उपाध्यक्ष मा.श्री.जयंत मोरे सर यांच्या शुभहस्ते व संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ व्यवहारे, सेक्रेटरी शिवाजी चटके, सह सेक्रेटरी विजय पाटील, खजिनदार प्रकाश सुरवसे, वस्ताद वसंत कुलकर्णी, सदस्य गजानन लामकाने, किरण बायस, प्रकाश पवार, बंडू कदम यांच्या



उपस्थितीत ध्वजारोहन करण्यात आले.

यावेळी सुरेश जानकर, कृष्णा जोशी, अमोल जाधव, अतुल कोर्थींबीरे, संजय हिरळीकर, कन्हैय्या मुक्ता, श्रीनिवास कोटा, रणजीत खताळ, जालिंदर काटकर, संभाजी मळगे, बबन झिंगाडे, सागर शिंदे, अजय रणवे, प्रकाश जाधव, महेश पवार, साहिल नरळे, यश नागणे, संतोष अंजिखाने, यश डांगे, सिध्देश्वर आयवळे, रविकांत जाधवआदी सभासद व्यायामपटू व क्रीडाप्रेमी बहुसंख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक विजय पाटील व सुत्रसंचालन गणेश कुलकर्णी यांनी केले तदनंतर पाहुण्यांच्या हस्ते मिठाई वाटप करण्यात आली.


VNP MOTORS

Multi Brand Car Sales & Services

सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप

OFFER

पेट्रोल कार: SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-

डिजेल कार: SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-

AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-

FREE PICK-UP & DROP

CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center

8000-92-8007

VNP MOTORS Pvt. Ltd.

Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service

GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007




# भाजप उमेदवाराच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांची तोफ धडाडणार

## कुरुल येथे २९ जानेवारी रोजी सभा

**कुरुल (कटूसत्य वृत्त):-** होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था अर्थात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांचे रणांगण चांगलेच तापले असून मोहोळ तालुक्यातील भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची कुरुल (ता. मोहोळ) येथे उद्या गुरुवार दि. २९ जानेवारी तोफ धडाडणार आहे.

दरम्यान मोहोळ तालुक्यातील भारतीय जनता पार्टीचे जिल्हा परिषदेसाठी ६ तर पंचायत समितीसाठी १२ उमेदवार असून उद्या होणाऱ्या या प्रचाराच्या सभेसाठी राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष तथा माजी आमदार राजन पाटील, सपोनि ज्ञानेश्वर उदार, माजी आमदार यशवंत माने, कुरुल जि.प. गटाचे उमेदवार तथा जकराय शुगरचे चेअरमन सचिन जाधव,



भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, जिल्हा सरचिटणीस विकास वाघमारे, समाधान वाघमोडे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अंकुश आवताडे, तालुका उपाध्यक्ष लहू वाघमोडे, कुरूल पंचायत समिती गणाचे उमेदवार, बिरुदेव मोटे, जालिंदर लांडे, सुरेश जाधव, भाऊसाहेब पाटील, आनंद जाधव, महेश जाधव आदी उपस्थित होते.

# शिवसेना गटनेतेपदी अमोल शिंदे यांची निवड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेतील राजकीय हालचालींना वेग आला असून, शिवसेनेच्या (शिंदे गट) गटनेतेपदी अमोल बाळासाहेब शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. शिवसेनेचे मुख्यनेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे.

शिवसेना मध्यवर्ती कार्यालयाकडून यासंदर्भात अधिकृत पत्र प्रसिद्ध करण्यात आले आहे. शिवसेनेचे सचिव संजय भाऊराव मोरे यांच्या स्वाक्षरीने हे पत्र सोलापूरचे शहरप्रमुख सचिन मोहन चव्हाण यांना पाठवण्यात आले आहे.

**महत्त्वाचे मुद्दे -**

निवडः अमोल बाळासाहेब शिंदे यांची सोलापूर महानगरपालिका गटनेतेपदी नियुक्ती.

आदेशः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेवरून ही प्रक्रिया पार पडली.

सूचनाः सदर आदेशाचे तंतोतंत पालन करावे, अशा स्पष्ट सूचना स्थानिक पदाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि महापालिकेतील पक्षाची पकड मजबूत करण्याच्या दृष्टीने ही निवड अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. अमोल शिंदे यांच्या



निवडीमुळे सोलापूर शिवसेनेला नवीन बळ मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## संपादकीय

# ‘आत्ताच कसा काय कंठ फुटला?’

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या एकच सवाल विचारला जातो आहे. ‘या सगळ्यांना आत्ताच कसा काय कंठ फुटला?’ हा सवाल निर्माण होण्यामागे कारण आहे, ते म्हणजे भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, ज्येष्ठ नेते गणेश नाईक आणि मनोहर भिडे यांची अलीकडील वक्तव्ये. या तिन्ही व्यक्तींच्या विधानांमुळे केवळ राजकीय वादच पेटले नाहीत, तर तथाकथित हिंदुत्ववादी शक्तींमधील अंतर्गत संघर्ष उघड्यावर आल्याची चर्चा संपूर्ण महाराष्ट्रात रंगली आहे.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी महापालिका निवडणुकांच्या ऐन तोंडावर केलेली काही अनाठाई वक्तव्ये पक्षालाच महागात पडली. लातूरमध्ये विलासराव देशमुख यांच्या आठवणी पुसण्यासंदर्भातील विधानामुळे भाजपला थेट निवडणुकीत फटका बसला. एवढ्यावरच न थांबता, कल्याण-डोंबिवली परिसरात ‘स्वबळा’चा अनाठाई आव आणत त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला विनाकारण डिवचले.

त्याचा परिणाम असा झाला की अंबरनाथमध्ये हातातोंडाशी आलेली सत्ता भाजपच्या हातून गेली, तर उल्हासनगरमध्ये शिंदे गटाने भाजपला अलगद बाजूला सारले. MMR भागातही भाजपपेक्षा शिंदे सेनेने कमी नुकसान सहन केले. प्रश्न असा आहे की हे राजकीय नुकसान चव्हाणांच्या वक्तव्यांचे फलित आहे की पक्षांतर्गत कुठल्यातरी मोठ्या खेळीचा भाग?

यानंतर अचानक गणेश नाईक यांचाही ‘कंठ फुटला’. ‘भाजपने परवानगी दिली तर एकनाथ शिंदे यांना संपवू’ अशी भाषा त्यांनी वापरली. ही भाषा राजकीय असली, तरी तिचा अर्थ फार खोल आहे. कारण खरेच एकनाथ शिंदे यांना संपवण्याची ताकद गणेश नाईक यांच्यात असती, तर त्यासाठी त्यांना भाजपच्या परवानगीची गरजच पडली नसती.

वास्तविक, नवी मुंबईपलीकडे राजकीय विस्तार करण्यात गणेश नाईक अपयशी ठरले. सत्ता वाचवण्यासाठी त्यांना भाजपच्या वळचणीला जावे लागले. याउलट, एकनाथ शिंदे यांनी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाच्या पाठिंब्यावर का होईना, पण स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. विधानसभा, नगरपालिका आणि महापालिका निवडणुकांत मर्यादित का होईना, पण यश मिळवले. हा फरकच गणेश नाईक यांच्या विधानांना पोकळ ठरवतो.

मनोहर भिडेना ‘साक्षात्कार’ आत्ताच का? या सगळ्यानंतर मनोहर भिडेचा ‘कंठ’ही अचानक फुटला. शरद पवार देशद्रोही आहेत आणि लवासा ही महाराष्ट्राला लागलेली कीड आहे, असा त्यांना आता साक्षात्कार झाला. प्रश्न असा की हा साक्षात्कार आत्ताच का?

पवारांचे राजकारण, लवासा प्रकल्प, हे विषय नवे नाहीत. मग १२ जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवरच भिडेना हे सगळे दिसू लागले, हा योगायोग मानायचा का?

हे सगळे एकाच वेळी घडणे हा निव्वळ योगायोग मानणे भोळेपणाचे ठरेल. महाराष्ट्रात एकनाथ शिंदे ब्रँड आणि शरद पवार ब्रँड हे दोन्ही कुठल्या ना कुठल्या स्वरूपात जिवंत ठेवणे हे काँग्रेसला रोखण्यासाठी आवश्यक आहे, हे भाजपच्या रणनीतीकारांना चांगलेच ठाऊक आहे. अशा वेळी या दोन्ही ब्रँडमध्ये परस्पर संघर्ष पेटवण्यासाठी काही नेत्यांना ‘बोलते’ केले गेले असेल, तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही.

नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकांत पवार ब्रँड फारसा चाललेला दिसला नाही. शरद पवार गप्प होते, सुप्रिया सुळेही प्रचारात दिसल्या नाहीत. अजित पवार पुणे-पिंपरीत सक्रिय होते, पण भाजपवर थेट हल्ला केल्यामुळे उलट नुकसानच झाले. राष्ट्रवादीचे अस्तित्व डळमळीत झाले असताना, काँग्रेस थोडी सावरतेय असे कुणाला वाटले असेल का? आणि तसे वाटले असेल, तर त्यांना वेळीच रोखण्यासाठी भिडेचा कंठ अचानक फुटला नसेल, अशी शंका गैर ठरवता येणार नाही.

भिडे पवारांवर बोलतात, राष्ट्रवादी भडकते, त्याचा काही प्रमाणात त्यांनाच स्थानिक पातळीवर लाभ होतो. ही साखळी भाजपला माहीत नसेल, असे मानणे राजकीय अज्ञान ठरेल.

एकूण काय, तर महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या जे काही घडते आहे ते अपघाती नाही. अचानक फुटलेले कंठ, वेळेवर झालेली वक्तव्ये आणि नेमक्या निवडणुकीच्या काळात उफाळून आलेले वाद हे सगळे कुठल्यातरी मोठ्या स्क्रिप्टचे भाग आहेत का, हा प्रश्न अनुत्तरितच आहे.

पण इतके मात्र नक्की की, कुठेतरी पाणी मुरले आहे... आणि ते पाणी निवडणुकीच्या रणांगणात कुणाला फायदेशीर ठरेल, हे लवकरच स्पष्ट होईल.

अनेक विचारवंतांना व राजकीय विश्लेषकांना असे वाटते की, माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या पुरस्कारावरून व मंत्री गिरीश महाजन यांनी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा केलेल्या अवमान वरुन उठलेलं रणकंदन थांबवण्यासाठी. मात्र हे स्क्रिप्ट देणाऱ्यालाच माहिती असेल.

# प्रजासत्ताक, प्रजेची सत्ता आणि सत्य..

आपण सत्तेहत्तरावा प्रजासत्ताक दिन साजरा करत आहोत. प्रजासत्ताक दिन जरी आपण दरवर्षी साजरा करत असलो तरीही अजूनही देशातील नव्वद टक्के पेक्षा जास्त लोकांना प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व, पार्श्वभूमी, आणि गांभीर्यच नाही. हि केवळ शोकांतिका नाही तर आपण स्वतःला कितीही हुशार, बुद्धिमान व सुशिक्षित समजत असलो तरीही प्रजासत्ताक दिन, संविधान आणि देश याबाबत आपली अक्कल, आपले विचार शुन्य असुन आपला मेंदू विकसित झाला नसल्याचे हे प्रमाण आहे. स्वतःला सुशिक्षित, विद्वान समजणाऱ्यांना जर संविधान, प्रजासत्ताक आणि देश हे जर समजत नसेल, याबाबत जागृती नसेल तर ती विद्वत्ता आणि ते शिक्षण कोणत्याही कामाचे नसुन तो असणारा केवळ बौद्धिक मतीमंद व्यक्ती होय. बऱ्याच लोकांना प्रजासत्ताक दिवस म्हणजे सुट्टीचा दिवस वाटतो तर बऱ्याच लोकांना प्रजासत्ताक दिन म्हणजे झेंडा दिवस वाटतो. शाळेत किंवा जिथे कुठे प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो त्या ठिकाणी प्रजासत्ताक दिनाचा खरा अर्थ, प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व व त्याचे फायदे यावर कधीच सखोल आणि निष्पक्ष चर्चा वा प्रबोधन झालेच नाही. स्वतःला सुशिक्षित व विद्वान समजणाऱ्या लोकांना जर प्रजासत्ताक दिनाचा अर्थ व महत्त्व कळत नसेल तर आपले शिक्षण व विद्वत्ता कोणत्या गुणवत्तेची आहे हे तपासणे आवश्यक आहे. स्वंयघोषित सुशिक्षित व विद्वान हा उल्लेख वारंवार यासाठी करावा लागत आहे की याच लोकांची बौद्धिक पातळी अशी असेल तर गाव खेड्यातील अडाणी आणि कष्टकरी जनतेला प्रजासत्ताक दिन व त्याचे गांभीर्य कसे कळेल? त्यांना प्रजासत्ताक चा खरा अर्थ कोण सांगणार? प्रजासत्ताक देशामध्ये अडाणी, कष्टकरी गाव खेड्यात राहणाऱ्या लोकांचे काय स्थान आहे? प्रजासत्ताक व्यवस्थेचा खरचं तळागाळातील लोकांना फायदा झाला का? असे अनेक प्रश्न आहेत ज्यावर चर्चा, संमेलन व जागृती होणे गरजेचे आहे. केवळ शहीदांचे गाणे लाऊन देशभक्तीचा देखावा करता येत नाही. जिवाची बाजी लावून ब्रिटीशांच्या तावडीतून देशाला स्वातंत्र्य करताना जे जवान शहिद झाले, ज्यांनी आपले आयुष्य भारतीयांना हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी, देशाचा विकास होण्यासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य केले त्यांचे स्मरण करण्याचा दिवस अर्थात पंधरा ऑगस्ट स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करतो. परंतु प्रजासत्ताक दिनी शहिदांचे गाणे लाऊन लोकांना भावनिक करून मुळ मुद्यावरून लक्ष विचलित करून प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व लोकांना कळूच नये अशी रितसर व्यवस्था केली जाते. प्रजासत्ताक दिनी चर्चा व्हायला पाहिजे ती संविधानावर, संविधान निर्माण करणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वर. पण आजही संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नावही घेण्याचे धाडस येथील विकृत व बौद्धिक कमकुवत लोकांकडून होत नाही. याचे कारण ते कितीही शिकलेले असतील तरीही त्यांच्या मेंदुचा विकासच झालेला नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे संविधान हे देशाचे आहे. संविधानावर देश चालतो, संविधान निर्माण झाले म्हणून प्रजासत्ताक दिन आपण साजरा करतो. देशाचे सर्वोच्च असलेले संविधान आजही काही लोक विशिष्ट लोकांचे संविधान आहे असे समजून संविधान वाचत नाहीत, घरात आणत नाहीत म्हणजे किती ही बौद्धिक दिवाळखोरी आहे. संविधान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले म्हणून कित्येक लोक संविधान घरात आणत नाहीत अशा मानसिकतेच्या लोकांना कसे विद्वान म्हणता येईल. मोठमोठ्या महाविद्यालयात शिकून, अंगावर पांढरे कपडे घालून आणि लाखात पगार घेणे म्हणजे हुशार किंवा सुशिक्षित आहे असे मुळीच नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे बौद्धांचे आहेत म्हणून संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर नाकारणारे लोक बौद्धिक दरिद्री तर आहेतच पण देशद्रोही आणि धर्मद्रोही सुद्धां आहेत. कारण संविधान हे देशाचे आहे. आणि भारतीय माणसाने भारतचे संविधान लिहले. आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जेव्हा संविधान लिहले तेव्हा ते हिंदूच होते. जगातील सर्वात मोठा विद्वान तत्कालीन हिंदू, जगातील सर्वोच्च संविधान ही बाब हिंदू धर्मीयांसाठी धमार्चा व्यक्ती म्हणून आणि जगात सर्वात सुंदर संविधान लिहले म्हणून देशाचे नागरिक म्हणून संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान करणे किती गौरवाची बाब आहे. पण हे ज्यालाच कळेल जो खरा धमार्चा आणि खरा देशाचा आहे. बरेच लोक म्हणतात संविधान बदलायला पाहिजे. का बदलायला पाहिजे तर केवळ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले, त्यातील बराचसा भाग इतर देशाकडून घेतलेला आहे वगैरे वगैरे बोलुन स्वतः ची अक्कल पाजळत बसतात. पण ते हे करतांना आपल्याच धमार्तील तत्कालीन विद्वान आणि हुशार दोनशे चौऱ्यांशी लोकांनी संविधान देशाच्या वतीने स्विकृत केले म्हणजे आजचे स्वयंघोषित विद्वान त्या दोनशे चौऱ्यांशी लोकांच्या देशभक्ती वर व विद्वतेवर प्रश्नच निर्माण करत नाहीत तर त्यांची विद्वत्ता झूगारून लावतात. त्या स्वधर्मीय लोकांपेक्षा आजचे स्वयंघोषित लोक जास्त हुशार झाले का? दोनशे चौऱ्याशी लोकांच्या सह्या झाल्या तेव्हा कुठे डॉ बाबासाहेब आंबेडकर संविधानाचे शिल्पकार ठरले. आणि याच संविधानाने अर्थात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक माणसाला माणसात आणले, गरीब, श्रीमंत, स्त्री पुरुष किंवा जाती धर्म याचा विचार न करता केवळ व्यक्ती म्हणून मान सन्मान आणि संधी निर्माण करून करू दिली. देशाच्या संपत्तीत प्रत्येकाला समान हिस्सा दिला. झोपडीतील, शेतीतील, महालातील, श्रीमंत माणसाला एकच महत्त्व दिले आणि सर्वांना देश चालवण्याचा अधिकार दिला. ते दिले म्हणून चौकटीत च्या आत असणाऱ्या महिला विमानात फिरतात, चुल आणि मुलच सांभाळणाऱ्या महिला आज जिल्हा देश सांभाळत आहेत, महिलांनी पुरुषांच्या समोर उभेही राहू नये असे असताना आज पुरूषांच्या समोर स्त्रिया जात आहेत, चहा विकणारा देश चालवत आहे हे केवळ आणि केवळ भारतीय संविधानाने मुळ शक्य झाले. जनतेच्या हातात सत्ता संविधानाने दिली. याचा अर्थ कोणत्याही प्रकारचा भेद न करता कोणताही योग्य व्यक्ती जो मतदार आहे देशाच्या कोणत्याही भागात देशाचा कारभार करणयासाठी निवडणूकीच्या माध्यमातून किंवा नोकरीच्या माध्यमातून जाऊ शकतो तिथे गरीब श्रीमंत स्त्रि पुरुष किंवा जात धमार्चा कोणताही भेद केला जात नाही. यालाच जनतेची सत्ता म्हणतात. जनतेच्या हितासाठी जनतेनेच आपला कारभार करून आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक प्रगती करून घेणे म्हणजे प्रजासत्ताक आहे. प्रजासत्ताक देशात संविधानाने बोलण्याचा, अभिव्यक्त होण्याचा, व्यवसाय करण्याचा, शिक्षणाचा, सार्वजनिक मालमत्तेचा व नैसर्गिक साधन संपत्तीचा उपभोग घेण्याचा अधिकार दिला पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे हा अधिकार नाकारला कोणी यावरही चर्चा होणे आवश्यक आहे. महिलांवर बंधने घालून त्यांना गुलाम करून शिक्षण व विकासापासून कोणी दुर केले होते? मुलींनी घराबाहेर पडू नये, मुली शिकल्या म्हणजे धर्म बुडतो असे माणल्या जाणाऱ्या समाजातील स्त्रियांना पुरुषां प्रमाणे मानसन्मान, शिक्षण, नोकरी आणि पगार देऊन सामाजिक व आर्थिक उन्नती करणारे संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल किती महिला प्रामाणिक आहेत. अंगावर महागडी साडी, चेहऱ्यावर फांऊडेशन, हे फक्त संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे उपकार आहेत. कोणत्याही धमार्ने महिलांना एवढे हक्क अधिकार तर सोडा पण महिलेला माणूस म्हणून सुद्धां सन्मान दिला नाही ते महान काम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून केले. गरिबातील गरीब व्यक्तीही शिक्षण घेऊ शकतो, निवडणूक लढू शकतो आणि देश चालवू शकतो हे संविधानाने दिलेले अधिकारी असले तरीही सत्य काय आहे यावर विचार केला तर शिक्षण आणि निवडणूक धनदांडग्या लोकांच्या हाती गेले. निवडणूक व्यक्तीचे काम नाही तर पैसा बघून लढवली जाते. प्रजेची सत्ता असताना प्रजेला एवढे भिकारी बनवले कि प्रजा निवडणुकीत हजार पाचशे घेऊन कोणालाही मत देते ही व्यवस्था निर्माण केली गेली. हजार पाचशे एका मतासाठी देणारा निवडून आला कि किती कमवत असेल याची कल्पना सर्वसामान्य मानसाला नसणारच आहे. संविधानाने अभिव्यक्त होण्याचा अधिकार दिला असला तरीही येथे जनतेचा आवाज दाबला जातो, जनतेच्या समस्या लक्षात घेतल्या जात नाहीत, अडाणी, पाखंडी लोक राजकारणात जाऊन धर्माच्या आडून चुकिचा इतिहास, चुकिचा धर्म सांगुन लोकांना बौद्धिक गुलाम व भक्त बनवत आहेत. जनतेचा आवाज कोणीच ऐकायला तयार नाही. मिडिया निवडणूक आयोग, विरोधी पक्ष आणि धमार्चे लोक सत्तेचे गुलाम झाल्याने जनतेच्या समस्या वाढत आहेत आणि जे सत्तजसोबत हात मिळवणी करत आहेत त्यांची भरभराट होत आहे. प्रजासत्ताक मध्ये सत्ता जनतेच्या हाती असण्याचे एकमेव शस्त्र म्हणजे मताधिकार हा मताधिकार इव्हिएम च्या माध्यमातून काढून घेतला आहे. जनता विरोधात, कार्यकर्ते विरोधात, नेते विरोधात असतानाही जर तेच लोक निवडून येत असतील तर त्यांना लोकांच्या मताची नाही तर यंत्राची गरची आहे. म्हणून लोक पेपर वर निवडणुक व्हायला पाहिजे म्हणत असताना ही यंत्रावर होत आहेत. याचाच अर्थ प्रजेची सत्ता येण्या आधीच प्रजेला सत्तेपासून कोसो दुर नेले जात आहे आणि हेच सत्य आहे. लोकशाही मध्ये सत्य बोलणे गुन्हा आणि भ्रष्टाचार, व्यभिचार, धार्मिक कट्टरता पाळणे संस्कार झाले आहेत. देश अधोगतीला जात असताना देशातील मुठभर नेते मात्र देशातील माया जमवत आहेत हे लोकशाहीला मारक आहे. खरी लोकशाही, खरा प्रजासत्ताक दिन यावर चर्चा प्रबोधन होत नाही आणि एक भारतीय भारताच्या विकासाचा ग्रंथ वाचत नाही तो देश कशाच्या आधारावर प्रगती करेल? जगाला लाजवेल असे संविधान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण करून वेगवेगळ्या जातीधमार्ला, वेगवेगळ्या बोलीभाषेला, वेगवेगळ्या खानपान असलेल्या, वेगवेगळी वेशभूषा असलेल्या आणि वेगवेगळी नावे असलेल्या लोकांना एकच ओळख भारतीय म्हणून देऊन समान हक्क अधिकार बहाल केले आणि ते जनतेला लागु झाले तो हाच दिवस २६ जानेवारी. प्रजासत्ताक दिनांचा विजय असो. भारताचे संविधान आणि संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन.

प्रजासत्ताक दिनाच्या मंगलमय सदिच्छा



**विनोद पंजाबराव सदावर्ते**
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा:9130979300

# पालकमंत्री गोरे यांच्याकडून प्रजासत्ताक दिनानिमित्त सर्व नागरिकांना शुभेच्छा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारत देश 15 ऑगस्ट 1947 रोजी दीर्घकालीन संघषार्नंतर स्वतंत्र झाला. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाला एक सुसंघटित, लोकशाहीवादी आणि न्याय्य व्यवस्था देणे ही मोठी जबाबदारी होती. यासाठी 26 नोव्हेंबर 1949 रोजी भारतीय राज्यघटना स्वीकारण्यात आली आणि ती 26 जानेवारी 1950 रोजी अंमलात आणण्यात आली. ही राज्यघटना भारतीय लोकशाही प्रणालीचा दीपस्तंभ आहे, असे प्रतिपादन राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

पोलीस परेड ग्राउंड येथे आयोजित भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम प्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक ग्रामीण अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, राज्य राखीव पोलीस बलाच्या समादेशक दिपाली काळे, माजी आमदार नरसिंग मेंगजी, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे प्रमुख तसेच पदाधिकारी, स्वातंत्र्यसैनिक, ज्येष्ठ नागरिक, पालक, विद्यार्थी, पत्रकार व अन्य मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले की, भारतीय लोकशाही प्रणालीचा दीपस्तंभ ठरलेली राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी लिखित संविधान आहे. घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. त्यांनी संविधान निर्मितीत बहुमोल योगदान दिले. संविधानाने आपल्याला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा वारसा दिला. प्रत्येक नागरिकाला समान अधिकार, धर्म स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि शिक्षणाचा हक्क दिला. त्यामुळे भारतातील लोकशाही ही जगातील सर्वात मोठी आणि सशक्त लोकशाही म्हणून ओळखली जाते, असे त्यांनी सांगितले.



26 जानेवारी 1950 रोजी भारताने लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केला. भारतीय संविधान अंमलात आले आणि नागरिकांना मूलभूत अधिकार प्राप्त झाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाने स्वतःची दिशा ठरविली. विविधतेत एकता हा भारताचा आत्मा प्रजासत्ताक दिनाद्वारे अधोरेखित होतो. भारताचा प्रजासत्ताक दिन हा केवळ उत्सव नसून आपल्या लोकशाही मूल्यांचा, संविधानाचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा सन्मान आहे. आपण सर्वांनी मिळून देशाच्या प्रगतीसाठी योगदान देऊ या, असे आवाहन पालकमंत्री गोरे यांनी केले.

देशाची, राज्याची तसेच आपल्या जिल्ह्याची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी जागरूक नागरिक म्हणून आपण सर्वांनी एकत्रित येऊन काम करणे आवश्यक आहे. संविधानाने दिलेल्या अधिकारांचा वापर करताना कर्तव्यांचे पालन करणे. सामाजिकता, बंधुता आणि एकात्मता जपणे. पर्यावरणाचे संरक्षण करणे. शिक्षण, आरोग्य आणि स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करणे. लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे. पंढरपूरची वारी मुळे जिल्ह्याला विशेष ओळख मिळाली असून पंढरपूर, अक्कलकोट, सिद्धेश्वर मंदिर, ऐतिहासिक किल्ले आणि नैसर्गिक स्थळे जिल्ह्याला पर्यटनाच्या नकाशावर महत्वपूर्ण स्थान देतात, असेही श्री. गोरे यांनी सांगितले.

प्रारंभी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर येथे उपस्थित असलेले ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, लोकप्रतिनिधी, ज्येष्ठ व मान्यवर नागरिक पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि पत्रकार बांधवांची सदिच्छा भेट घेऊन प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी पालकमंत्री श्री गोरे यांनी भारतीय राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेचे वाचन केले. त्यानंतर याप्रसंगी तंबाखू मुक्ती, कुष्ठरोग मुक्ती तसेच बालविवाह प्रतिबंध बाबत सर्वांना शपथ देण्यात आली.

तत्पूर्वी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी परेड कमांडर प्रशिक्षणार्थी पोलीस अधीक्षक राहुल आत्राम यांच्या समवेत परेड निरीक्षण केले, त्यानंतर परेड चे संचलन राहुल आत्राम यांच्या नियंत्रणाखाली पार पडले. परेड पथ संचलनात पोलीस विभाग, शहर पोलीस विभाग महिला व पुरुष पथक, राज्य राखीव पोलीस दल महिला व पुरुष, शहर पोलीस दलाच्या शीघ्र प्रतिसाद दल, होमगार्ड पथक, एनसीसी पथक बॉम्बशोधक पथक, श्वान पथक, आपत्ती व्यवस्थापन बचाव दल पथक आदींचा समावेश होता.

**पुरस्कार व सन्मान –**

पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर अंतर्गत एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद रोहिदास वाघमारे तसेच शहर वाहतूक शाखा दक्षिणचे पोलीस उपनिरीक्षक राजकुमार टोळनुरे यांना पोलीस दलात उत्कृष्ट कार्य व सेवा बजावल्याबद्दल राष्ट्रपती पदक प्राप्त झालेले असून यांचा सत्कार पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आला.

तर पोलीस अधीक्षक कार्यालय सोलापूर ग्रामीण अंतर्गत कार्यरत अधिकारी कर्मचारी यांनी विविध क्रीडा प्रकार तसेच गुन्ह्यांचे तपास पूर्ण करण्यात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये श्रीमती अश्विनी दिलीप गाजरे, प्रसाद छगन मांढरे, शिवानंद सौदागरे, दत्तात्रय शंकर बोरिगिड्डे, नागेश राजाराम बनकर, नारायण विनायकराव पवार, नागनाथ जयराम खुणे आदींचा समावेश आहे.

# प्रशासकीय इमारती मध्ये अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या हस्ते ध्वजारोहण

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** भारताचा 77 वा प्रजासत्ताक दिनानिमित्त अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात सकाळी 7.45 वाजता ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था किरण गायकवाड, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्न धान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

प्रारंभी अप्पर जिल्हाधिकारी



गणेश निराळी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, त्यानंतर राष्ट्रगीत व राज्य गीत गायन झाले. त्यानंतर अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी उपस्थित अधिकारी कर्मचारी व नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# युवा नेते रोहन सुरवसे पाटील यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** स्वाभिमानी ब्रिगेड संघटनेचे संस्थापक अध्यक्ष युवा नेते रोहन सुरवसे पाटील यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. राजकीय आणि सामाजिक पटलावर, मतांच्या राजकारणासाठी काहीजण समाजसेवा करताना दिसतील.परंतु रोहन सुरवसे पाटील हे, ना... मतांच्या राजकारणासाठी, ना... जनतेला दाखवण्यासाठी, समाजसेवा करताना दिसणार नाहीत.

कारण आपण प्रत्येकजण समाजाचे देणे लागतो, हा समस्त समाज माझा आहे. मानव ही जात माझी आहे आणि माणुसकी हा माझा धर्म आहे. हा निर्मळ आणि निःस्वार्थी हेतू ठेवत, पालखी सोहळा असो, महापुरुषांची जयंती असो, किंवा अन्य निमित्त असो रोहन सूरवसे पाटील हे मायेचा घास भरवताना निदर्शनात आले आहेत.

तर अनेकदा राज्यातील विविध अनाथ आश्रमाला भेट देऊन, नेहमी ते मदतीचा हात देत आहेत. शिवाय गोरगरीब गरजू विद्यार्थ्यांना शालेय



साहित्य वाटप करणे, रक्तदान शिबिर राबवणे, वृक्ष रोपण करणे असे विविध प्रकारचे उपक्रम ते स्वाभिमानी ब्रिगेड संघटनेच्या वतीने राबवताना दिसतात. रोहन सुरवसे पाटील यांनी समाजासाठी अखंड आयुष्य पणाला लावले आहे. समाज विकासात स्वतःला झोकून दिले आहे. थोर महापुरुषांचा आदर्श आणि त्यांचे विचार घेऊन,अत्यंत कमी वयात समाज कार्याचा प्रचंड मोठा ध्यास घेत त्यांनी, कर्तुत्वाचा आलेख गगनाला भिडवला आहे.

शिखर शिंगणापूरच्या पायथ्याशी असलेल्या,माळशिरस तालुक्यातील, कोंडबावी गावातून रोहन सुरवसे पाटील यांनी लहान वयातच, समाजकार्याचा विडा उचलला होता. अत्यंत मनमिळावूपणा, सोज्वळता, नम्रता, संयमता, उत्कृष्ट वाणी, सौजन्य आणि सहनशीलता या विविध गुणांमुळे रोहन सुरवसे पाटील यांच्या सानिध्यात महाराष्ट्र राज्यातला तमाम युवावर्ग आला आणि त्यांच्या सहकार्याने समाज कार्यात वाहून घेतले. आज त्यांच्या वाढदिवसा निमित्त,त्यांच्या कार्यकर्त्यांनी विविध प्रकारचे सामाजिक उपक्रम राबवित त्यांना आनोख्या पद्धतीने शुभेच्छा दिल्या.

## वात्रटिका

### पुन्हा एकदा बोलले

वय झालं तरी असे लोक
डोक्यात का ठेवतात किडे...
वादग्रस्त नाही बोलले तर
मग ते कसले गुरुजी भिडे...
वयाबरोबर तोल जातो आणि
नको तेच माणूस बोलतो...
हातात उरत नाही बळ मग
तो नाकाने कांदे सोलतो...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# टेंभुणीर्चे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांचा पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते सन्मान



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील टेंभुर्णी पोलीस स्टेशन हद्दीतील दाखल झालेल्या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांचा तपास करून यशस्वी छडा लावल्याण्यास यश आल्या बद्दल टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांना प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून माननीय पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते प्रशंसापत्र देऊन सन्मानित करण्यात आला.

सोलापूर जिल्ह्यातील टेंभुर्णी पोलीस स्टेशन ठाण्यांतील गंभीर गुन्ह्यांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांची निवड माननीय पोलीस अधीक्षक, सोलापूर यांनी 'उत्कृष्ट तपास अधिकारी' म्हणून केली होती. पोलीस निरीक्षक पवार यांनी मौजे अरण (ता. माढा) येथील अल्पवयीन मुलाच्या खून प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपींना अटक केली, भीमानगर येथील अनोळखी मृतदेह प्रकरणात मृताची ओळख पटवून सख्खा भाऊ व मावसभाऊ यांच्यासह आरोपींना अटक करण्यात आली, बेंबळे चौक येथे वृद्ध महिलेची फसवणूक करून लूट करणाऱ्या महिला व पुरुष आरोपींना अटक करून पुणे येथून चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला व फियार्दी महिलेला तिचे दागिने परत देण्यात आले, तसेच टेंभुर्णी एसटी स्टँडवरील बस चोरी, घरफोडी, वाहन चोरी व गहाळ मोबाईल प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणात गुन्ह्यांचा छडा लावून मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून महामार्गावरील प्राणघातक अपघात करून पळून गेलेल्या वाहनांचा शोध घेऊन आरोपी अटक करून मयतांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यात आल्या प्रकरणी आज 26 जानेवारी निमित्त सोलापूर येथे सोलापूर ग्रामीणचे पोलीस अध्यक्ष अतुल कुलकर्णी यांच्या उपस्थितीत सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला त्याबद्दल टेंभुर्णी शहरातील व परिसर नागरिकातून त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे

# आर्या कॉलेज ऑफ फार्मसी ची कोल्हापूरच्या एस जी फाइटोफार्मा कंपनीस भेट




**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी येथील आर्या कॉलेज ऑफ फार्मसी च्या विद्यार्थ्यांनी डी फार्मसी अभ्यासक्रमाच्या फार्मसी क्षेत्रभेटी अंतर्गत कोल्हापूर मधील एसजी फायटो फार्मा प्रायव्हेट लिमिटेड या औषध निर्माण कंपनीस भेट दिली. या भेटीदरम्यान कंपनीमधील व्यवस्थापकांनी व कर्मचाऱ्यांनी कंपनीमधील सर्व कामकाजाबद्दल तसेच फार्मासिस्टचे फार्मा कंपनीमधील महत्त्व, कार्य याबद्दल सविस्तर माहिती दिली.

विद्यार्थ्यांनी कंपनीमधील सर्व विभागास भेटी दिल्या जसे की औषधे बनवणारी यंत्रसामग्री, लेबलिंग, पॅकेजिंग, स्टोरेज तसेच पावडर फॉमुर्लेशन, कॅप्सूल, टॅबलेट, लिक्विड फॉमुर्लेशन या सर्व विभागांना भेटी देऊन माहिती संग्रहित केली. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे व शंकेचे निवारण कंपनीमधील कर्मचाऱ्यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चव्हाण यांनी कंपनीच्या व्यवस्थापकांचे व सर्व कर्मचाऱ्यांचे आभार मानले. या शैक्षणिक भेटीदरम्यान महाविद्यालयातील सर्व शिक्षक व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# नातेपुते पोलिसांची दबंग कारवाई, गावठी कट्टा पिस्तूल बाळगणाऱ्या इसमास अटक

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते येथील शिखर शिंगणापूर पाटी हॉटेल गोल्डन ईरा परिसरात गावठी कट्टा पिस्तूल बाळगणाऱ्या इसमास नातेपुते पोलिसांची दबंग कारवाई करून त्या इसमास पकडून एक गावठी कट्टा पिस्तूल, तीन जिवंत काडतुसे आणि एक मॅगझीन जप्त करून पिस्तूल बाळगणारा आरोपी

गौरव पोपट होळकर (वय ३१ वर्षे) रा. १० फाटा, होळ, ता. बारामती, जि. पुणे यास नातेपुते पोलिसांनी ताब्यात घेतले. याबाबत सविस्तर माहिती अशी की, सध्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक सुरू असून

२६ जानेवारी २०२६ रोजी रात्री नातेपुते पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी रात्र गस्त घालत असताना कोणीतरी अज्ञात व्यक्ती गावठी कट्टा पिस्तूल बाळगून फिरत असल्याची माहिती बातमीदार मार्फत हद्दीत गस्त घालत असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना मिळाली असता शिंगणापूर पाटी येथील हॉटेल गोल्डन ईरा परिसरात गावठी कट्टा बाळगणाऱ्या इसमास पकडण्यासाठी सापळा रचला व पहाटे ०१ : ३५ वाजण्याच्या सुमारास पिस्तूल बाळगणाऱ्या गौरव पोपट होळकर (वय ३१ वर्षे) यास घेराव घालून ताब्यात घेतले. व त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्या कमरेला एक देशी बनावटीचे गावठी पिस्तूल मिळून आले. त्याच्याकडून एक गावठी कट्टा पिस्तूल, तीन जिवंत काडतुसे आणि एक मॅगझीन जप्त करून पिस्तूल बाळगणारा आरोपी



> जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुका सुरू आहेत. सर्वांनी कायद्याचे नियम पाळावे नागरिकांनी अनुचित प्रकार घडू नये याची दक्षता घ्यावी एखादी संशयास्पद गोष्ट निदर्शनास आली असल्यास नागरिकांनी तात्काळ नातेपुते पोलीस ठाण्याची संपर्क साधावा.
>
> **महारुद्र परजणे** (सपोनी नातेपुते पोलीस ठाणे )

गौरव पोपट होळकर (वय ३१ वर्षे) रा. १० फाटा, होळ, ता. बारामती, जि. पुणे यास नातेपुते पोलिसांनी दोन पंचांच्या साक्षीने ताब्यात घेतले. पोलीस ठाणेकडील पो.नाईक राकेश माणिक लोहार यांचे फियार्दीवरुन नातेपुते पोलीस ठाणे येथे शस्त्र अधिनियम कायद्याअंतर्गत गुन्ह्याची नोंद करण्यात आली.सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अकलूज संतोष वाळके यांचे मार्गदर्शनाखाली नातेपुते पोलीस ठाणेचे सहा. पोलीस निरीक्षक महारुद्र परजने व नातेपुते पोलीस ठाणे कडील गुन्हे प्रकटीकरण विशेष पथकातील पोसई सोनल मोरे, पोलीस हवालदार राहुल रुपनवर, देविदास धोत्रे,पोलीस नाईक राकेश लोहार, पो.कॉ. रणजित मदने,पो. कॉ. रमेश बोराटे पो.कॉ. संतोष वारे व राहुल वाघमोडे गोरे यांनी विशेष मेहनत घेतली. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोफौ.सतीश पाटकुलकर हे करीत असून सदर अवैध शस्त्र कुठून आणले त्याचे कोण कोण साथीदार आहेत त्याबाबत पोलीस कस्टडी रिमांड घेऊन तपास चालू आसल्याचे नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांनी सांगितले.

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानतर्फे महिलांसाठी हलव्याचे दागिने स्पर्धा उत्साहात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या दहाव्या वर्धापनदिनानिमित्त संस्थेच्या वतीने महिलांसाठी हलव्याचे दागिने स्पर्धा आयोजित करण्यात आला होता. हा आठवा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला.

सोलापुरातील समाजकल्याण केंद्रात आयोजित या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मेडिकल कॉलेज सब पोस्ट ऑफिसच्या पोस्टमास्टर योगिता क्षिरसागर, शहा व कुलकर्णी डेव्हलपर्सच्या संचालिका अमृता कुलकर्णी, किर्ती इंडस्ट्रीजच्या मॅनेजिंग डायरेक्टर आरती बेत, ॲड सुनिता नरोटे, संस्थेचे अध्यक्ष महेश कासट आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते. या स्पर्धेत २१ ते ६५ वयोगटातील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कामिनी गांधी इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन डिझायनरच्या कामिनी गांधी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

अध्यक्षीय मनोगतात पोस्टमास्टर योगिता क्षिरसागर यांनी महिलांनी स्वतःच्या संरक्षणाबाबत सजग राहावे, भारतीय संस्कृती जपत आत्मनिर्भर व्हावे, असे आवाहन केले. श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठान महिलांसाठी दरवर्षी विविध उपक्रम राबवित असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रतिष्ठानच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त एकूण दहा उपक्रम घेण्यात येणार असून आतापर्यंत विद्यार्थी दत्तक योजना, सेनेटरी पॅड वितरण, स्टील पाणी टाकी स्थापन, अन्नदान, दिवाळी फराळ वाटप, चित्रकला स्पर्धा तसेच हॉस्टेलमधील विद्यार्थ्यांना चादर वाटप असे विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले.या सर्व उपक्रमांची माहिती संस्थापक महेश कासट यांनी प्रास्ताविकातून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल बिराजदार यांनी केले तर आभार प्रदर्शन अक्षता कासट यांनी मानले.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिला तापडिया, सुजाता सक्करगी, रुपा कुत्ताते, शुभांगी लचके, आर्या लचके, भारती जवळे, नर्मदा कनकी, उमा मुंगड, श्रेया लचके, दिपक करकी, राजेश केकडे, अभिजीत व्हानकळस, सुरेश लकडे, श्रीरंग रेगोटी, श्रीरंग श्रीगन, सौरभ करमळकर, नरेश कनकी आदींनी परिश्रम घेतले.

**हलव्याचे दागिने स्पर्धेचा निकाल असा**

- प्रथम : कोमल सोनवणे - पैठणी
- द्वितीय : प्रियंका जाधव - डिनर सेट
- तृतीय : अमृता भोसले - कुकर
- उत्तेजनार्थ : पुजा आंडगे - बांगडी बॉक्स

**CHANGE IN NAME**

I have declared that my name is **SHILVANT GENSIDDH CHHAPEKAR** as per Aadhar card and Pan Card and **SHILAVANT GENSHIDH CHHAPEKAR** as per Degree certificate both are same Person.

# राजराजेश्वरी शिक्षण संकुलात प्रजासत्ताक दिन उत्साहात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विनायक नगर येथील राजराजेश्वरी प्राथमिक व माध्यमिक प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.प्रथम सेवानिवृत प्राचार्य विजयकुमार हुल्ले यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतीय संविधान ग्रंथाचे पूजन करण्यात आले. माता पालक संघाच्या सदस्या शितल पवार, पालक शिक्षक संघाचे सदस्य शिवहार गाढवे यांच्या हस्ते ध्वजपूजन व ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली कुंभार ,माध्यमिक प्रशालेचे मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी आदी उपस्थित होते.यावेळी संविधान प्रास्ताविक, राष्ट्रगीत, राज्यगीत, ध्वजगीतानंतर देशभक्तीगीतांवर संगीतमय कवायत घेण्यात आले. राजराजेश्वरी संगीत विद्यालयाचे विद्यार्थिनींनी 'हिंद देश के निवासी'व तिसरीच्या विद्याथीर्नी 'नन्ना मुन्ना राही हु' हे देशभक्तीपर गीत सहवाद्य सादर केले. यावेळी स्वराली देवरनादगी, शिवराज लाच्यण, भाग्यश्री गाढवे, श्रद्धा बाकळे, चैत्राली हणमगोंडा आदी विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्व सांगितले.यावेळी असाक्षर मुक्त गावाची शपथ, साक्षरता शपथ घेण्यात आले. मुख्याध्यापिका वैशाली कुंभार म्हणाले, विद्यार्थ्यांना आपण भारताचे एक जबाबदार नागरिक आहोत याची जाणिव ठेवून देशसेवा करण्याचे आवाहन केले.मान्यवरांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना लाडू खाऊ वाटप करण्यात आले. वंदे मातरम ने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उज्वला भांड यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संकुलातील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी वृंदानी परिश्रम घेतले.

**जाहीर प्रसिध्दीकरण**
क्र.अभि/कावि नं.११ /२०२५
**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

श्री. बबन संतोष भोसले
वय- २२ वर्षे, धंदा- शिक्षण, } अर्जदार
रा. मलिकपेठ, ता. मोहोळ,जि. सोलापूर
**विरुध्द**
ग्रामपंचायत मलिकपेठ,
ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत } सामनेवाला
मलिकपेठ, यांचेवर बजावविण्यात यावी.)

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराचा जन्म ता.०३/०८/२००२ रोजी मौजे मलिकपेठ, ता.मोहोळ,जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदार यांच्या जन्म दाखल्याची ता.०३/०८/२००२ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे ऑगस्ट २००२ चे अभिलेखात अर्जदार म्हणजेच बबन संतोष भोसले यांचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि. ६/२/२०२५ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे.कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे.
ता.२८/०१ /२०२६
**लिपीक** (शिक्का) हुकूमावरुन **तहसीलदार मोहोळ सोलापूर**

**जाहीर प्रसिध्दीकरण**
क्र.अभि/कावि नं. /२०२६
**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

संतोष जनार्दन सुरवसे,
वय - ४३ वर्षे, धंदा-शेती, } अर्जदार
रा. मोहोळ, ता. मोहोळ,जि. सोलापूर.
**विरुध्द**
नगरपरिषद मोहोळ,ता.मोहोळ,(अर्जाची नोटीस मा. मुख्याधिकारी मोहोळ नगरपरिषद,मोहोळ ता. मोहोळ, } सामनेवाला
यांचेवर बजाविण्यात यावी.

ज्याअर्थी यातील अर्जदार यांचे आजोबा रामा शंकर सुरवसे यांचा मृत्यूदि.०५/०२/२००० रोजी मौजे मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे मयत झालेलेआहेत. तरी, त्यांच्या मृत्यूची नोंद सामनेवाला यांचेकडे होऊन, तसा मृत्यू दाखलामिळण्यासाठी अर्जदार यांनी या मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी जर कोणास वरील अर्जदार त्यांचे आजोबा रामा शंकर सुरवसे यांचामृत्यू दाखला देण्यास कोणाचीही हरकत अडथळा असल्यास त्यांनी मे. कोर्टानेनेमलेली पुढील दि.१३ २/२०२६ रोजी अथवा त्यापुर्वी स्वत: अगर वकीलामार्फतलेखी म्हणणे दाखल करावे. मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास मे. कोर्टअर्जदाराच्या अर्जावर पुढील योग्य ते हुकूम करतील. त्यानंतर कोणाचीही हरकतविचारात घेतली जाणार नाही. ही जाहीर नोटीस दिली ता. २७/०१ / २०२६
**लिपीक** (शिक्का) हुकूमावरुन **तहसीलदार मोहोळ सोलापूर**

**जाहीर प्रसिध्दीकरण**
क्र.अभि/कावि नं. /२०२५
**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

विठ्ठल पंडित धोटे
रा.भांबेवाडी ता.मोहोळ जि.सोलापूर } अर्जदार
**विरूद्ध**
ग्रापंचायत वरकुटे ता. मोहोळ } सामनेवाला

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार शिवानी विठ्ठल धोटे जन्म दि.२६/२/२०२२ रोजी वरकुटे ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्या कडे शिवानी विठ्ठल धोटे यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे फेब्रुवारी २०२२ चे आभिलेखात अर्जदार याची मुलीची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.११/२/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे
ता. २७/१/२०२६
**लिपीक** (शिक्का) हुकूमावरुन **तहसीलदार मोहोळ सोलापूर**

**चौकशीची जाहीर नोटीस**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर विभाग सोलापूर**
**ब.अ.नं.१९२०/२०२५**
**कि.क.अ.क्र. १९२१/२०२५**
संस्थेचे नांव:- प्रकाशानंद सेवा संघ सोलापूर -
न्यास नों.क्र. :- एफ -५१३९ / सोलापूर
राजेशम भुमय्या येमुल } अर्जदार
**विरूध्द**
कोणी नाही } गैरअर्जदार

सदरील अर्ज अर्जदार यांनी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ व सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० चे कलम १२-अ अन्वये संस्थेच्या उद्देशात व घटना नियमावलीत बदल करून मिळणेसाठी अर्ज मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त साहेब यांच्या कार्यालयात दाखल केलेले आहे. या नोटीसीध्दारे कळविण्यात येते की. या न्यासाचे आपले काही संबंध असल्यास अथवा काही हरकत / तक्रार नोंद करायची असल्यास आपण स्वत: किंवा वकिलामार्फत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत आपली हरकत लेखी स्वरूपात दाखल करावी ३० दिवसानंतर आपले कुठलेही प्रकारच्या हरकतीचा व कुठल्याही बाबींचा विचार केला जाणार नाही. आणि एकतर्फा हुकुम करून सदरचे प्रकरण निकाली काढण्यात येईल.याची कृपया नोंद घ्यावी. ही नोटीस माझ्या सहिनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे शिक्यानिशी दि.२७/०१/२०२६ दिली आहे.
(शिक्का) **अधिक्षक**
**सार्वजनीक न्यास नोंदणी कार्यालय**
**सोलापूर विभाग सोलापूर**

**चौकशीची जाहीर नोटीस**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर विभाग सोलापूर**
**फेरफार अहवाल / अर्ज कमांक :- १७५७ /२०२५**
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक : मागास समाज सेवा मंडळ सोलापूर - नोंदणी क्रमांक एफ -४०९ /सोलापूर .
अर्जदार :- श्री सुभाष चंद्रम चव्हाण

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपाआयुक्त, सोलापूर विभाग सोलापूर हे वर नमूद केलेल्या फेरफार अहवाल / नोंदणी अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२-अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१.वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय?आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

२.खालील निर्दष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

(अ) जंगम मिळकत :- काहीही नाही .

(ब) स्थावर मिळकत :-

डी व सब डी II सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर हद्दवाढ मधील मौजे नेहरू नगर येथील गट नं १८/२ पैकी १ हे २२ आर मा जॉईन्ट चॅरिटी कमिशनर पुणे विभाग पुणे यांचेकडील अर्ज नं ४४/२०२०मधील दिनांक ११/०२/२०२५ रोजीच्या आदेशानुसार कमी सदर मिळकर कमी करण्यात याव. असा बदल अहवाल दाखल केलेला आहे. सदरच्या चौकशी प्रकारणामधे कोणास काही हरकत घ्यावयाची असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयात वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी . त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणारा नाही तसेच वरील मुदतीत कैफियत न असल्यास कोणास कांही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील, ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मदाय उपआयुक्त. सोलापूर यांचे शिक्यानिशी आज दि.२७ /०१/२०२६ रोजी दिली.
(शिक्का) **अधिक्षक**
**सार्वजनीक न्यास नोंदणी कार्यालय**
**सोलापूर विभाग सोलापूर**

**पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर**
**फोन क्र.(०२१८६)२२३२५३,२२३०१३,२२३१८७ फॅक्स क्र.(०२१८६)२२३००६**
**ई मेल:-** comcpandharpur@gmail.com

जा.क्र./पंनपं/आरोग्य/३६५/२०२६ दि. २०/०१/२०२६
पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर


**जाहिर निविदा**

सर्व कापड विक्रेते/उत्पादक, पुरवठादार, व शिंपी व्यावसायीक यांना कळविणेत येते की, पंढरपूर नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकडील मुकादम यांना कार्यालयीन ड्रेस शिवायचा आहे.

तरी चांगल्या प्रतिचे खाकी कापडासह शोल्डर लेबल व प्रत्येकाच्या नावाची पॉकेट नेमप्लेट बसवुन गणवेश शिवुन देणे प्रती ड्रेसचे दराचे कोटेशन निविदा धारकांनी आपल्या लेटर पॅडवर शासनाच्या सर्व करासह आपले कोटेशन दि. ३०/०१/२०२६ अखेर दु.२.०० वा. पर्यंत नगपरिषदेच्या बारनिशी विभागाकडे सादर करावे. कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार राखुन ठेवला आहे.

**सही/- (श्री. महेश रोकडे)**
**मुख्याधिकारी**
**पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर**

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) डोळे, नयन
२) काव्य, कविता
३) भाजप पक्षाचे नाव पूर्ण लिहा
४) सीतापती ५) वेळ वाया न घालवता, पटकन ६) न भिणारा ७) श्वास घेण्याचे इंद्रिय १०) नस उलट लिहा
१२) पाय १५) स्वस्तच्या विरूध्दार्थी
१७) समुद्राच्या पाण्याची चव
१८) बसपाचे निवडणूक चिन्ह
१९) वभ उलट लिहा
२०) जंगलातील प्राण्यांचा राजा
२१) स्वभावाने रागीट २४) शपथ (हिंदीत) २५) दमयंती पती २६) आईची बहीण २८) भाकरी थापण्याची मोठी थाळी ३०) भारताच्या उत्तरेकडील उत्तुंग पर्वत
३१) कामातून मिळालेला मोकळा वेळ
३२) अस्वलांचे खेळ दाखविणारा
३५) जुनाच्या विरूध्दार्थी
३६) दहा आणि सात मिळून होणारी संख्या
३७) लोखंडी आकडा, हुक
३९) शहर
४१) मास, महिना
४२) एक हिंदी न्यूज चॅनल-** तक
४३) एक म्हण-** घर पोकळ वासा

**आडवे शब्द :** १) संसदेचे एक सभागृह
४) भारत जोडो यात्रा काढणारे राष्ट्रीय काँग्रेसचे मुख्य नेते
८) स्वाद, रूची ९) पध्दत (हिंदीत)
११) सततची केलेली मागणी, तगादा १३) ख्रिश्चन धर्मसेविका
१४) दोन आणि एक मिळून होणारी संख्या
१५) राशीचक्रातील एक रास १६) फुलांची माळ, पराभव
१७) एक म्हण-** तशी माती
१८) भारतीय निवृत्त फिरकी गोलंदाज
२१) धातूचा बारीक तंतू २२) जंगल, अरण्य
२३) लगेच, तातडीने २७) दह्यात पाणी मिसळून घुसळलेले पेय
२८) सूर्योदयापूर्वीचा उष:काल २९) मनाला टोचणी लावणारे शल्य
३०) डासांमुळे थंडी वाजून येणारा ताप ३१) रास उलट लिहा
३२) संयम, धमकी देणे, धाप लागणे ३३) मक्षिका ३४) वतनाचा मालक
३७) दुर्ग, किल्ला ३८) बैलाच्या नाकात घातलेली दोरी
४०) महाराष्ट्रातील एक जिल्हा ४३) कपाची जोडीदार ४४) मार्ग, रस्ता (हिंदीत)
४५) राजाचे निवासस्थान ४६) बे दुणे

## सुडोकु - 162

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 3 | | | | | 1 | | |
| | | | | | 2 | 3 | | |
| 1 | | | | 5 | | | | 4 |
| 9 | 8 | | 1 | | 5 | | 7 | 2 |
| 2 | 5 | 7 | 9 | | | | 3 | 1 |
| 6 | 1 | 3 | 7 | 2 | 8 | | 4 | |
| 4 | 2 | | 5 | | 1 | | | 3 |
| | 7 | 8 | | | 9 | | | 5 |
| | 6 | | 4 | | | | | |

# क्रेडाई सोलापूरतर्फे ३० जानेवारीपासून प्रॉपर्टी एक्स्पो

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** क्रेडाई सोलापूर तर्फे प्लॉट, फ्लॅटस्, रो हाऊझेस्, बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स, वित्तीय संस्था आदींचे प्रदर्शन यंदा दि. ३० जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान नॉर्थकोट हायस्कुल मैदानावर आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती क्रेडाई सोलापूरचे अध्यक्ष अभिनव साळुंखे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवार, दि. ३० जानेवारी रोजी माजी सनदी अधिकारी व मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार प्रवीणसिंह परदेशी यांच्या हस्ते व सोलापूर जनता बँकेचे चेअरमन सुनील पेंडसे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी क्रेडाई नॅशनलचे सदस्य सुनिल फुरडे, क्रेडाई महाराष्ट्राचे उपाध्यक्ष



शशिकांत जिद्दीमनी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. सोमवार दि. २ फेब्रुवारी पर्यंत दररोज स. १० ते रात्री ८ दरम्यान सर्वांसाठी हे प्रदर्शन खुले असणार आहे. या प्रदर्शनाचे सोलापूर जनता सह बँक हे मुख्य प्रायोजक असून माऊली लँडमार्क व जेजेआरव्ही समर्थ प्रसाद हे सह प्रायोजक आहेत.'

यंदाच्या प्रदर्शनात सुमारे 65 स्टॉल्स असून सोलापूरातील क्रेडाई सभासदांचे विविध प्लॉटस्, फ्लॅटस्, बंगलोज, रो-हाऊसेस, कमर्शिअल कॉम्प्लेक्स् तसेच अनेक बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स, वित्तीय संस्था भाग घेत असून प्रदर्शनाच्या ठिकाणीच गृहकजार्ची माहिती ही मिळणार असल्याची माहिती या प्रदर्शनाचे समन्वयक आनंद पाटील यांनी दिली. सोलापूरकरांनी या प्रदर्शनाचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. या प्रदर्शनात रविवार दि. १ फेब्रुवारी रोजी क्रेडाई वुमन्स विंग व युथ विंग च्यावतीने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आल्याची माहिती दिली.

वुमन्स विंग व युथ विंग - क्रेडाई सोलापूर शाखेद्वारे क्रेडाई सोलापूर वुमन्स विंग व युथ विंगची स्थापना करण्यात आली असून बांधकाम व्यवसायात महिलांचा व युवकांचा सहभाग, प्रशिक्षण, शैक्षणिक दौरा सक्षमीकरण आदी कार्यक्रम हाती घेण्यात येत आहेत.

या पत्रकार परिषदेस दक्ष पटेल, संतोष सुरवसे, किशोर चंडक. गुरुराज येल्लटी, प्रदीप पिंपरकर, प्रियदर्शन शाह, समीर गांधी, नंदकिशोर मुंदडा, अभय सुराणा, सिध्देश्वर जोकारे, जनता बँकेचे विनायक दोनारके उपस्थित होते.

# राष्ट्रवादी भवन येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शहरातील राष्ट्रवादी भवन कार्यालय येथे भव्य व शिस्तबद्ध ध्वजारोहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष हाजी मकबूल मोहोळकर यांच्या शुभहस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला.

ध्वजारोहणानंतर राष्ट्राचे प्रतीक असलेल्या तिरंगा ध्वजास उपस्थितांनी सलामी दिली. यावेळी सामूहिक संविधान वाचन करण्यात आले. भारतीय संविधानाने दिलेले हक्क, कर्तव्ये व लोकशाही मूल्यांचे स्मरण करून देत प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व उपस्थितांना पटवून देण्यात आले. त्यानंतर राष्ट्रगीताच्या गजरात संपूर्ण परिसर देशभक्तीच्या भावनेने भारावून गेला.



या कार्यक्रमास परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, अनिल उकरंडे, प्रा.श्रीनिवास कोंडी, अजित बनसोडे, युवक प्रदेश सरचिटणीस खलील शेख, VJNT सेल अध्यक्ष रुपेश कुमार भोसले, सहकार सेल अध्यक्ष भास्कर आडकी, वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख बसवराज कोळी, विधी सेल अध्यक्ष ॲड. जयप्रकाश भंडारे, सोशल मीडिया शहराध्यक्ष वैभव गंगणे, शहर सचिव दत्तात्रय बनसोडे, OBC सेल कार्याध्यक्ष आयुब शेख, कामगार संघटना सेल अध्यक्ष मार्तंड शिंगारे, कार्याध्यक्ष संजय सांगळे, शहर उत्तर विधानसभा कार्याध्यक्ष प्रकाश झाडबुके, अकील पठाण, प्रज्ञासागर गायकवाड, दक्षिण विधानसभा अध्यक्ष श्रीकांत वाघमारे, कार्याध्यक्ष प्रदीप भालशंकर, विश्वनाथ वाघमारे, म. जिना शेख, महिपती पवार, रोहित माने, मोहम्मद पटेल, मनुराज झाडबुके यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने संविधानाचे रक्षण, लोकशाही मूल्यांची जोपासना व सामाजिक एकतेचा संदेश देत हा कार्यक्रम शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# जिल्हा परिषद सोलापूर येथे प्रजासत्ताक दिन साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेत भारत देशाचा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करणेत आला. जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळ्याचे पुजन करून ध्वज वंदन करणेत आले. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागाचे प्रकल्प संचालक चंद्रकांत जगताप, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, सामान्य प्रशासन विभागाच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायती) सुयंर्कात भुजबळ,, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी,, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, शिक्षणाधिकारी (माध्यमिक सचिन जगताप, शिक्षणाधिकारी कादर शेख, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता सप्ताळे, गटविकास अधिकारी यांचे सह विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते. या प्रसंगी सिंईओ कुलदीप जंगम यांनी सर्वाना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. प्रारंभी हरीभाई देवकरण



प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी राज्यगीत सादर केले. त्यानंतर जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी कुष्ठरोग निर्मूलनाची शपथ दिली.

जिल्हा परिषदेचे सिईओ कुलदीप जंगम व अभिज्ञा किरण ठोके या बालिकेच्या हस्ते हवेत तिरंगा रंगाचे फुगे सोडून उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना प्रजासत्ताक दिनाचे शुभेच्छा दिल्या. त्यानंतर जिल्हा परिषद मुख्यालयात सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांचे पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करणेत आले. स्वीय सहाय्यक सुधाकर माने देशमुख, कक्ष अधिकारी अविनाश गोडसे यांचे सह कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचालन मेहताब शेख यांनी केले.

# कर्मवीर कृषी महाविद्यालयाच्या आरोग्य तपासणी शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषि महाविद्यालयाच्या राष्ट्रिय सेवा योजनेचे विशेष निवासी शिबिर कापसेवाडी येथे सुरू असून या दरम्यान नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी व रक्त तपासणी शिबिर याचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे उद्घाटन शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे जनरल सेक्रेटरी पि. टी. पाटिल यांच्या हस्ते करण्यात



आले या मध्ये गावामधील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती या कार्यक्रमासाठी आरोग्य विभागाचे डॉ. खरात, डॉ. जोगदंड, नितीन कापसे, देशमुख, प्रा.अशा आदलिंगे व ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थिनी साक्षी इनामे हिने केले तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संतोष शेंडे यांनी केले.

# एस.व्ही.सी.एस. प्रशालेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एस.व्ही. सी. एस. हायस्कूल एमआयडीसी येथे भारताचा 77 वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमा पूजनानंतर संस्थेचे संचालक शशिकांत रामपुरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी शिक्षण संकुलातील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर उत्कृष्ट खडे व बैठे कवायत प्रकार सादर केले. प्राथमिक, माध्यमिक व इंग्लिश मीडियम मधील विद्यार्थ्यांचे भाषणे झाली यावेळी बोलताना मुख्याध्यापक म्हमाणे म्हणाले, संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्ष, लोकशाही या तरतुदींचा प्रत्येक भारतीयांनी तंतोतंत आचरण केल्यास देशाची एकता अबाधित



राहणार असल्याचे सांगितले. यावेळी मुख्याध्यापक म्हमाणे यांना जिल्हा कलाध्यापक संघाकडून आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार व कलाशिक्षक पंडित स्वामी यांना आदर्श कला शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल संचालक शशिकांत रामपुरे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर सुंदर नृत्य सादर केले. इंग्लिश मिडीयमच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर कराटे क्रीडा प्रकारचे प्रात्यक्षिक सादर केले. शेवटी विद्यार्थ्यांना गोड खाऊ देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेतील सर्व शिक्षक- शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण संपन्न

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण संपन्न झाले.

रेल्वे मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या या शासकीय सोहळ्यात एकूण ३६ पथकांनी सहभाग घेतला होता. यावेळी पोलीस, गृहरक्षक दल, एनसीसी, स्काऊट तसेच शहरातील विविध विद्यालयाच्या विध्यार्थी-विद्यार्थ्यीनीं यांच्या पथकाने केलेल्या संचलनाचे प्रांताधिकारी इथापे यांनी निरिक्षण करुन मानवंदना स्विकारली.

शासकीय ध्वजारोहण समारंभास आमदार अभिजीत पाटील, नगराध्यक्षा प्रणितीताई भालके, माजी आमदार प्रशांत परिचारक, उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.प्रशांत डगळे, तहसीलदार सचिन लंगुटे,



गटविकास अधिकारीअमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, पोलीस निरिक्षक दशरथ वाघमोडे, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, दीपक शिंदे, डी.एस.आसवले, वैभव बुचके, आणीबाणीत करावास भोगलेले लक्ष्मीकांत गडम, अशोक क्षीरसागर, श्रीमती. रुक्मिणी पांडुरंग देशपांडे, सुभद्रा मेटकरी, भालचंद्र कुलकर्णी यांच्यासह नगरसेवक, स्वांतत्र्यसैनिक, पदाधिकारी, शासकीय अधिकारी-कर्मचारी, तसेच मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संविधान उद्देशिकाचे वाचन करुन उपस्थितांना ध्वज प्रतिज्ञा, बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा देण्यात आली तसेच व्यसनमुक्तीची व कुष्ठरोगमुक्तीची शपथ घेतली. त्याचबरोबर पोलीस दलाच्या वतीने राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. यावेळी प्रांताधिकारी इथापे यांच्या हस्ते सहभागी पथकांना प्रमाणपत्र आणि मानचिन्ह देण्यात आले

# सार्वजनिक शौचालय दुरुस्ती कामांची आयुक्तांकडून प्रत्यक्ष पाहणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध भागांतील सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती व नूतनीकरणाची कामे हाती घेण्यात आली असून काही ठिकाणी ही कामे पूर्ण झाली आहेत, तर काही ठिकाणी सध्या प्रगतीपथावर आहेत. या पार्श्वभूमीवर आज महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.या पाहणीदरम्यान आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी दुरुस्ती पूर्ण झालेल्या तसेच सुरू असलेल्या सार्वजनिक शौचालयांची पाहणी करून कामाच्या गुणवत्तेबाबत सविस्तर आढावा घेतला. काम दर्जेदार झाले आहे की निकृष्ट दजार्चे आहे, वापरात नागरिकांना अडचणी येत आहेत का, स्वच्छता, पाणीपुरवठा, प्रकाशव्यवस्था तसेच देखभाल याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.

यावेळी आयुक्तांनी परिसरातील नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या, सूचना व अपेक्षा जाणून घेतल्या. नागरिकांनी काही



ठिकाणी झालेल्या कामाबाबत समाधान व्यक्त केले, तर काही ठिकाणी अजून सुधारणा आवश्यक असल्याच्या सूचना दिल्या. नागरिकांच्या सूचनांची दखल घेत आयुक्तांनी संबंधित ठेकेदार व विभागीय अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सुधारणा तातडीने करण्याचे निर्देश दिले.

सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती करताना गुणवत्तेवर कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही. नागरिकांच्या आरोग्य व स्वच्छतेशी संबंधित कामे अत्यंत दर्जेदार व टिकाऊ पद्धतीनेच पूर्ण करावीत, अशा स्पष्ट सूचना आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी यावेळी दिल्या. शहर स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी ठेवण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असून सार्वजनिक सुविधांची गुणवत्ता सुधारण्यासाठी अशा प्रकारच्या प्रत्यक्ष पाहण्या नियमितपणे करण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, सह. आयुक्त शशिकांत भोसले, सर्वजनिक आरोग्य कार्यकरी अभियंता व्यकटेश चौबे, मुख सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, विभागीय अधिकारी सुनीता हिबारे, जावेद पानगल यांच्या सह मुख आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक उपस्थिती होते.

# सहकार महर्षि साखर कारखान्यामध्ये प्रजासत्ताक दिन साजरा



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर-अकलूज, जि.सोलापूर या कारखान्यामध्ये २६ जानेवारी २०२६ रोजीचे आपल्या भारत देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजवंदन सोहळा कारखान्याच्या संचालिका कु. स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांचे शुभहस्ते सकाळी ८.०० वाजता संपन्न झाला.

यावेळी कारखान्याचे संचालक, खातेप्रमुख व कामगार यांनी राष्ट्रध्वजास मानवंदना देऊन राष्ट्रगीत व ध्वजगीताचे गायन केले. त्यानंतर कारखाना मुख्य कार्यालयासमोरील सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांचे पुणार्कृती पुतळ्यास मान्यवरांचे शुभहस्ते पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. सदर प्रसंगी कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख तसेच संचालक लक्ष्मण शिंदे, रामचंद्र सिद, जयदिप एकतपुरे, रामचंद्र ठवरे, संचालिका सुजाता शिंदे, कार्यलक्षी संचालक जयवंत माने-देशमुख, माजी संचालक भिमराव काळे, मोहनराव लोंढे व शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडीया लेजर शो कमिटी संचालक पांडुरंग एकतपुरे तसेच कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले, सेक्रेटरी अनिल काटे, चिफ अकाउंटंट-युवराज इनामदार, मुख्य शेतकी अधिकारी रविराज उर्फ समाधान चव्हाण, चिफ इंजिनिअर सुर्यकांत गोडसे, को जन मॅनेजर युवराज निंबाळकर व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बँक ऑफ इंडिया च्या अधिकाऱ्यांसाठी क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बँक ऑफ इंडिया अधिकारी संघटना, पुणे युनिट यांच्या वतीने सोलापूर येथे सोलापूर झोनमधील बँक ऑफ इंडिया च्या अधिकाऱ्यांसाठी क्रिकेट, बॅडमिंटन व रसीखेच या क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये सोलापूर झोनमधील तब्बल २८५ अधिकाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कामाच्या दैनंदिन तणावातून मुक्ती मिळावी, वर्क-लाईफ बॅलन्स, परस्पर एकजूट व सौहार्द वाढावे या उद्देशाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धांदरम्यान खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण असून अधिकारी व त्यांच्या कुटुंबीयांनीही मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लावली.

या कार्यक्रमास बँक ऑफ इंडिया अधिकारी संघटना, पुणे युनिटचे अध्यक्ष कॉ. अमोल सांगळे व सचिव कॉ. प्रमोद शिंदे उपस्थित होते. त्यांनी

आपल्या मनोगतात अशा उपक्रमांमुळे अधिकाऱ्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण होते व संघटनात्मक बंध अधिक दृढ होतात, असे सांगितले. स्पर्धांचा समारोप बक्षीस वितरण समारंभाने झाला. सहभागी सर्व अधिकाऱ्यांचे व आयोजन समितीचे यावेळी अभिनंदन करण्यात आले.

# नागेश करजगी ऑर्किड स्कूल मध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील नागेश करजगी ऑर्किड स्कूल मध्ये २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. श्रीकांत कुलकर्णी यांच्या हस्ते भारत मातेची पूजा करण्यात आली. त्यानंतर ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार दादा करजगी, संस्थेच्या सचिवा वषार्ताई विभुते, स्कुल व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे, ज्यू. कॉलेज प्राचार्या स्मिता कुलकर्णी, स्कुलच्या मार्गदर्शिका मीना पारखे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. श्रीकांत कुलकर्णी यांनी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने उपस्थित विद्याथ्यार्ना यशस्वीतेचा कानमंत्र दिला.संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार दादा करजगी यांनी सर्व विद्यार्थी व शिक्षक



वर्गाला प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

स्कुलच्या प्राचार्या रुपाली हजारे यांनी संविधानाचे महत्व सांगून प्रजासत्ताक दिनाच्या सर्व विद्यार्थी व पालकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी शाळेच्या आर एस पी व स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक असे पथ संचलन करुन उपस्थितांची वाहवा मिळविली. शाळेच्या मैदानावर झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्य सादर करून आपल्या कलेला उपस्थितांची वाहवा मिळविली.

सदर कार्यक्रमाला पालकांनी देखील उपस्थिती दर्शविली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अनुजा सुसलादी यांनी केले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# नेताजी शिक्षण संकुलात प्रजासत्ताक दिन उत्साहात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण संकुलातील मराठी प्राथमिक शाळा, इंग्लिश मिडीयम स्कूल, माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य सुभाष धुमशेट्टी, प्राचार्य रविशंकर कुंभार, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, पालक-शिक्षक संघाचे उपाध्यक्ष राजशेखर घंटे,



सहसचिवा वैशाली अभंगे, प्राथमिक पालक-शिक्षक संघटनेचे उपाध्यक्ष संतोष पुजारी, माता पालक संघाच्या सदस्या भाग्यश्री बंदलगी, इंग्लिश मिडीयम माता पालक संघटनेच्या सदस्या रुपाली म्हमाणे, इंग्लिश मिडीयम पालक-शिक्षक संघटनेचे उपाध्यक्ष रमेश परशी आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी जयश्री घुगरे यांना आदर्श माता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत, राज्यगीत व ध्वजगीताने झाली. त्यानंतर संविधान वाचन, असाक्षर मुक्त गावाची शपथ, कॉपीमुक्त शपथ, संचलन, कवायत, स्फूतीर्गीत, विद्यार्थ्यांची भाषणे व सांस्कृतिक कार्यक्रम शिस्तबद्ध पद्धतीने सादर करण्यात आले. खाऊ वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

विद्यार्थ्यांनी झेंडा आमुचा प्रिय देशाचा फडकत वरी महान, भारतभूमीचे आम्ही लेकरे, ए मेरे वतन के लोगो आदी देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. स्वरा चाळक, रिया बारड, स्वरा म्हेत्रे, समर्थ कोडमुर, श्राव्या नडगेरी, आर्यन बनसोडे, प्रांजल बनसोडे, अंजली तावसकर व स्वाती ठोंबरे यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व विशद केले.

यावेळी अध्यक्ष अण्णाराव कुंभार म्हणाले, भारत हा विविधतेत एकता जपणारा महान देश असून, संविधानाच्या मूल्यांवर चालत देश प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे सांगितले. येणाऱ्या काळात भारत जागतिक स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त प्राचार्य सुभाष धुमशेट्टी म्हणाले, विद्यार्थ्यांनी राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती, राष्ट्रिय एकात्मा यातून नेहमी देश करावे. यातून लहानपणापासूनच विद्यार्थ्यांमध्ये शिस्त व सामाजिक बांधिलकी दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितल पाटील यांनी केले तर शिवानंद पुजारी यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.